# उपविभागीय अधिकारी कार्यालय, कुडाळ
## जाहिर प्रगटन

सर्व नागरिक, शेतकरी बंधू-भगिनी आणि हितसंबंधीत यांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, कुडाळ उपविभागात प्रलंबित असलेली महसुली प्रकरणे/ वाद व प्रकरणांचा त्वरीत व गतिमान पद्धतीने निपटारा करण्यासाठी **'महात्मा जोतीराव फुले महसूल लोक अदालत अभियान'** शासनाच्या परिपत्रकानुसार आयोजित करण्यात येत आहे.

सदर अभियानांतर्गत **उपविभागीय अधिकारी कुडाळ, तहसिलदार कुडाळ/मालवण, सर्व मंडळ अधिकारी, तालुका -कुडाळ/मालवण** यांच्या महसूल न्यायालयात प्रलंबित असलेल्या महसुली अर्धन्यायिक प्रकरणांचा आपसी तडजोडीने व गतीने निपटारा करण्यात येणार आहे. उक्त अभियाना मध्ये खालील प्रकरणांचा वादी व प्रतिवादी, अपिलार्थी, गैरअपिलार्थी इत्यादींना नोटीस देऊन प्रकरण प्राधान्य क्रमाने निकाली काढण्या बाबत शासनाचे निर्देश आहेत.

**अभियानांतर्गत खालील प्रमुख बाबींचा निपटारा केला जाईल:**

- उपविभागीय अधिकारी कुडाळ यांच्या न्यायालयातील अपील प्रकरणे(अधिकार अभिलेख/कुळकायदा विषयक)
- तहसिलदार कुडाळ/मालवण यांच्या न्याालयातील चालू दावे (अधिकार अभिलेख/कुळकायदा विषयक)
- मंडळ अधिकारी स्तरावरील सुनावणी सुरु असलेल्या तक्रारी फेरफार नोंदी

**तडजोडीसाठी सुनावणी :-**

| अ.क्र. | स्थळ | दिनांक व वेळ | होणारे कामकाज |
|---|---|---|---|
| १ | उपविभागीय अधिकारी कार्यालय कुडाळ<br>तहसिलदार कार्यालय कुडाळ<br>सर्व मंडळ अधिकारी कार्यालये, ता.कुडाळ | ३०-०९-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | संबंधित कार्यालयात चालू असलेले दावे/हरकती/अपिल प्रकरणे यांचा तडजोडीने निपटारा करणेसाठी त्या-त्या कार्यालयात महसूल लोकअदालत घेणेत येईल. |
| २ | तहसिलदार कार्यालय मालवण<br>(उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांजकडील मालवण तालुक्यातील अपिल/दावे)<br>सर्व मंडळ अधिकारी कार्यालये, ता.मालवण | ०१-१०-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | |

तरी, कुडाळ उपविभागातील सर्व संबंधित हितसंबंधीत / पक्षकार, अर्जदार व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या प्रलंबित महसुली प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यासाठी

आपला दावा कुडाळ उपविभागातील ज्या महसूली न्यायालयात प्रलंबित आहे. त्या कार्यालयाशी विहित कालावधीत संपर्क साधून या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, ही विनंती.

(ऐश्वर्या काळुशे)
उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी, कुडाळ उपविभाग,
कुडाळ

प्रतः- १)मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग (कुळवहिवाट शाखा) यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.
२)मा. जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडे जाहिर प्रसिध्दीसाठी सादर.
३)तहसिलदार कुडाळ/मालवण यांजकडे तालुका व मंडळ स्तरावर महसूल लोकअदालतीचे नियोजन करणेसाठी रवाना.
४)संपादक,दै.तरुण भारत/पुढारी/प्रहार/लोकमत यांजकडे वृत्तपत्रात विनामुल्य जाहिर प्रसिध्दीसाठी.
५)संपादक,कोकण तडाखा न्युज/कोकण संवाद/नवप्रभात न्युज व इतर सोशल मिडीया चॅनल्स यांजकडे विनामुल्य प्रसिध्दीसाठी.